Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/May; 12pp.1-4  ISSN:-2230-7850

Research Papers

# इयत्ता नववीसाठी मराठी विषयाचे अध्यापन भूमिका पालन प्रतिमानाच्या सहाय्याने करून त्याची परिणामकारकता अभ्यासणे

प्राचार्य . डॉ . विवेक गं . इनामदार
स . से . सं . चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय
विष्णुपूरी नांदेड .

### *प्रस्तावना*

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे . मनुष्याची आज पर्यंतची प्रगती ही संघटन व समाज यांच्या बळावरच झाली आहे . अध्ययन प्रकियेला देखील हा नियम लागू पडतो . या दृष्टीने सामाजिक आंतरकिया कुलतील प्रतिमानांचा विचार करणे आवश्यक आहे . भूमिका पालन प्रतिमान हे फॅनी आणि जॉर्ज शेफॉल यांच्या आपलीवर आधारीत आहे . हे प्रतिमान सामाजिक परिस्थितीत व्यक्तीच्या वर्तनाला दिशा देते . स्वतःच्या व त्याचप्रमाणे इतरांच्या भूमिकेचा सादर करण्याची शिकवण या प्रतिमानातून मिळते .

भूमिका पालन प्रतिमानाच्या संरचनेत खालील पार्ययांचा समावेश होतो .

1 . मनोभूमिका तयार करणे
2 . सहभार्गीची निवड करणे
3 . रंगमंच व्यवस्था करणे
4 . निरीक्षक निवडणे
5 . अभिनय दाखविणे
6 . चर्चा व मूल्यमापन
7 . पूनॅअभिनय
8 . पूनॅचर्चा पूनॅमुल्यांकन
9 . तत्वशोधन

संशोधनाची उद्दिष्टे ः
1 . इयत्ता नववीसाठी भूमिकापालन प्रतिमानधारित अशी मराठी विषयाची अध्यापन सामुग्री विकसित करणे .
2 . भूमिका पालन प्रतिमानाच्या आधारे इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे अध्यापन करणे .
3 . पारंपारिक अध्यापन पध्दती व भूमिका पालन प्रतिमानाधारित अध्यापन यांच्या कलनिष्पतीची तुलना करणे .

व्याप्ती ः
1 . प्रस्तुत संशोधन हे इयत्ता नववीच्या मराठी विषयाशी संबधीत आहे .
2 . प्रस्तुत संशोधन हे भूमिका पालन प्रतिमानाधारित अध्यापनाशी संबधीत आहे .

मर्यादा ः
1 . प्रस्तुत संशोधकाचे निष्कर्ष हे इयत्ता नववीच्या मराठी विषयापूरतेच मर्यादित आहे .
2 . प्रस्तुत संशोधनात भूमिका पालन प्रतिमानाशिवाय अन्य प्रतिमानांचा विचार केलेला नाही .

शुन्य परिकल्पना ः
पारंपारिक पध्दतीने व भूमिका पालन प्रतिमानाद्वारे इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना विद्यार्थ्याच्या विषयाचे अध्यापन केले असता विद्यार्थ्याच्या अध्ययन निष्पती मध्ये हा सार्थ नाही .

अभिकल्प ः
प्रस्तुत संशोधनासाठी असमानगट अभिकल्प निवडण्यात आला .

संशोधन पध्दती ः
समस्या निवड - उद्दिष्टे निश्चिती - अध्यापन सामग्री विकसन - पूर्व चाचणी -समानगट निर्मिती - प्रत्यक्ष प्रयोग - तथ्य संकलन व विश्लेषण - निष्कर्ष .

सांख्यकिय विश्लेषण ः
प्रस्तुत संशोधनात t test हे सांख्यकिय परिणाम वापरण्यास आले . प्रत्येकी 20 विद्यार्थ्याचे दोन गट तयार करण्यात आले . या पैकी एक गट नियंत्रित व दुसरा गट प्रायोगिक होता .

| गट | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | Table t value | Calculated t value |
|---|---|---|---|---|---|
| नियंत्रित | 17 . 64 | 1 . 84 | 4 . 66 | . . . . . | . . . . . |
| प्रायोगिक | 22 . 33 | 1 . 77 | 4 . 66 | 2 . 14 | 5 . 89 |

0 . 05 स्तरावर Calculated t value hao table value पेक्षा अधिक आहे . अर्थात्‌दोहोंत सार्थ फरक आहे .

त्यामुळे या संशोधनात सून्य परिकल्पनेचा त्याग करण्यात आला .

निष्कर्ष ः

1 . इ . 9 वी साठी मराठी विषयाचे अध्यापन भूमिका पालन प्रतिमानाद्वारे करता येते .

2 . पारंपारिक अध्यापन पध्दतीपेक्षा भूमिका पालन प्रतिमानाधारित अध्यापन पध्दतीचा प्रयोग केल्यास विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पतीत सकारात्मक फरक पडतो .

शिफारशी ः

1 . भाषा विषयाच्या शिक्षकांनी भूमिकापालन प्रतिमानाचा उपयोग आपला अध्यापनात करावी .

2 . शिक्षक प्रशिक्षक संस्थानी प्रतिमानाधारित अध्यापनसाठी अध्यापन सामग्रीचे विकसण करावे .

3 . NCERT, SCERT इत्यादी संस्थानी प्रतिमानाधारित अध्यापन चालना देण्यासाठी विविध उपकमांची आयोजन करावे .

संदर्भ ः

1 . डॉ . वासंती फडके 'अध्यापनाची प्रतिमाने' (1998) नुतन प्रकाशन पुणे .

2 . डॉ . निलीमा सप्रे 'अध्यापनाचे प्रतिमाने' (2005) फडके प्रकाशन कोल्हापूर .

3 . डॉ . ह . ना . जगताप 'शिक्षणातील नवप्रवाह' व नवप्रवर्तने' (2006), नित्यनुतन प्रकाशन पुणे .